**महत्वाचे**
**सन २०१९ ची सुधारित प्रारुप सेवा जेष्ठता सूची.**

क्र.जिपना/ग्रापं/प्रशासन/४२७/२०२०,
ग्रामपंचायत विभाग, जि.प.नाशिक,
दि. १९ ऑगस्ट, २०२०.

प्रति,
**गट विकास अधिकारी (ऊ.श्रे.)**
**पंचायत समिती, ----------------------------- (सर्व)**

**विषय** :- ग्रामपंचायत कर्मचा-यांची दि. ०१ जानेवारी, २०१९ रोजीची सुधारित प्रारुप सेवा जेष्ठता सूची प्रसिध्द करणे बाबत.
संदर्भ :- १) शासन निर्णय क्र.व्हीपीएम-२००४/प्र.क्र.२६१/पंरा-५, दि. १८ ऑक्टोंबर २००५.
२) या कार्यालयाची प्रारुप सेवा जेष्ठता सूची प्रसिध्द पत्र क्र. जिपना/ग्रापं/प्रशासन/सं.५/८२/२०२०, दि. १४ फेब्रुवारी २०२०.

जिल्हा परिषद नाशिक अंतर्गत जिल्हा सेवा वर्ग-३ व ४ मधील विविध पदांच्या नियुक्तीसाठी दि. ०१ जानेवारी २०१९ रोजी पात्र असलेल्या ग्रामपंचायत कर्मचा-यांची प्रारुप सेवा जेष्ठता सूची उक्त संदर्भिय शासन निर्णयातील नमूद मार्गदर्शक सूचनांनुसार तयार करणेत येऊन संदर्भिय क्र.२ च्या पत्रान्वये प्रसिध्द करण्यांत आली होती व सदरची प्रारुप जेष्ठता सूची सर्व संबंधितांचे १० दिवसांचे आत निदर्शनास आणून द्यावी व त्यांची दिनांकित स्वाक्षरी घेऊन त्याप्रमाणेचा अहवाल आक्षेपासह या कार्यालयास सादर करणे बाबत कळविणेत आले होते. तथापि, यासंदर्भात एकाही गटाकडून अहवाल प्राप्त झाला नाही. यास्तव,

१. शासन ग्राम विकास व जलसंधारण विभागाकडील अधिसूचना दि. ०६ एप्रिल, २००५ मध्ये नमूद केलेप्रमाणे, ग्रामपंचायत कर्मचा-यांची प्रथम ग्रामपंचायत स्तरावर जेष्ठता सूची तयार करण्यात येऊन त्याप्रमाणे एकत्रित यादी शासन नियमातील तरतुदीनुसार, गटस्तरावरुन तपासून या कार्यालयास सादर होणे आवश्यक आहे. त्यामुळे अशी कार्यवाही झाली आहे किंवा कसे याबाबत गटस्तरावरुन छाननी करुन शासन नियम/निकषात बसत असून सदरची नावे खात्रीअंती बरोबर असल्याचे प्रमाणित करावे.
२. शासन ग्राम विकास विभाग, निर्णय क्र. व्हीपीएम-२६९९/प्र.क्र.२०६(१)/२१, दि. २१ जानेवारी, २००० नुसार, प्रत्येक ग्रामपंचायती मधील कर्मचा-यांचा आकृतीबंध ठरवून दिलेला आहे. त्याअनुषंगाने यादीतील कर्मचारी हे आकृतीबंधात आहेत किंवा कसे याची खात्री करण्यात यावी.
३. जे कर्मचारी मयत झाले आहेत किंवा कर्मचा-यानी राजीनामा दिला असल्यास तशी खात्री करणेत येऊन त्याप्रमाणेचा अहवाल सादर करणेत यावा.
४. सुधारित प्रारुप सेवा जेष्ठता सूचीस कोणास आक्षेप घ्यावयाचा असल्यास तो सोबतच्या नमुन्यात घेऊन त्याबाबत पुराव्याचे कागदपत्र जोडावे व ग्रामसेवक/ग्राम विकास अधिकारी यांचे अभिप्राय घेऊन, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, यांनी स्वत:चा अभिप्राय देऊन सदरचा आक्षेप जेष्ठता सूची प्रसिध्दीच्या दिनांकापासून १० दिवसांचे आत या कार्यालयाकडे पोहचेल अशा प्रकारे तातडीने सादर करावा.
५. गट विकास अधिकारी, पंचायत समिती यांनी त्यांचे गटातील ग्रामपंचायतीच्या कर्मचा-यांच्या निदर्शनास प्रारुप सेवा जेष्ठता सूची निदर्शनास आणून द्यावी. ज्या कर्मचा-यांची नांवे सदर यादीत समाविष्ट नाहीत त्याबाबतचा देखील अहवाल सादर करावा.
६. सुधारित प्रारुप सेवा जेष्ठता सूची विहित मुदतीत संबंधीत ग्रामपंचायतीच्या कर्मचा-यांच्या निदर्शनास आणून दिली नाही तसेच त्यांची स्वाक्षरी घेतली नाही व अशा कर्मचा-यांचे भविष्यात सदर जेष्ठता सूचीबाबत मानीव तारीख/पदोन्नती/जातीचा प्रवर्ग/जन्मतारीख इत्यादी बाबतचा आक्षेप घेतल्यास उद्भवणा-या परिणामांना सर्वस्वी आपले कार्यालयास जबाबदार धरणेत येईल याची नोंद घ्यावी.
७. सुधारित प्रारुप सेवा जेष्ठता सूची निदर्शनास आणून दिले बाबतचा अहवाल व आक्षेप हे दि. २५.०८.२०२० रोजी या कार्यालयास संबंधित आस्थापना लिपीकामार्फत न चुकता सादर करण्यात यावेत. प्रकरणी विलंब होणार नाही याची दक्षता घ्यावी. दि.२५.०८.२०२० पावेतो अहवाल प्राप्त न झाल्यास संबंधित गटाचा आक्षेपाचा अहवाल निरंक आहे असे समजून जेष्ठता सूची अंतिम करणेत येईल. भविष्यात तक्रारी उद्भवल्यास संबंधित कार्यालय जबाबदार राहील.
८. गट स्तरावरुन प्राप्त प्रस्तावातील नव्याने समाविष्ट कर्मचा-यांबाबत आकृतीबंधातील सलग सेवा नेमणूकीची तारीख/शैक्षणिक अर्हता याबाबत खात्री करावी.
९. यासोबत संबंधित ग्रामपंचायत कर्मचारी यांना जेष्ठता सूचीचे सुधारित प्रारुप निदर्शनास आणून दिल्याबाबत प्रमाणपत्र जोडले आहे. त्यात ग्रामपंचायत कर्मचारी यांची स्वाक्षरी घेऊन प्रत्येक ग्रामपंचायतीचे एक प्रमाणपत्र याप्रमाणे ग.वि.अ. यांनी प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक आहे.

प्रारुप सेवा जेष्ठता सुची http://zpnashik.maharashtra.gov.in या जिल्हा परिषदेचे संकेतस्थळावर उपलब्ध करणेत आली आहे.

**( रवींद्र परदेशी )**
**उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं.)**
**जिल्हा परिषद, नाशिक**

**प्रत** :- मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक यांना माहितीस्तव सादर.
**प्रत** :- मा. उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र.वि.) जिल्हा परिषद, नाशिक यांना माहितीस्तव सादर.

# प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की,. १० % ग्रामपंचायत कर्मचारी यांची सन २०१९ ची सुधारित प्रारुप जेष्ठतासूची संबंधित ग्रामपंचायत कर्मचारी यांना व्यक्तिश: निदर्शनास आणून देण्यात आली आहे.

**ग्रामपंचायतीचे नांव :- ---------------------------** **तालुका :- ---------------------**

| अ.क्र. | ग्रामपंचायत कर्मचा-याचे नाव | तालुका | जेष्ठता सूची निदर्शनास आणून दिल्याबाबत ग्रामपंचायत कर्मचारी यांची स्वाक्षरी. |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | | | |

वरिल प्रमाणे अ.क्र. १ ते ----- आकृतीबंधातील ग्रामपंचायत कर्मचारी यांना सन २०१९ ची सुधारित प्रारुप जेष्ठता सूची निदर्शनास आणून देण्यात आली आहे असे जेष्ठता सूची प्रकरणी प्रमाणित करण्यात येत आहे.

**ग्रा.से./ग्रा.वि.अ.** **वि.अ. (ग्रा.पं.) पं.स.** **सहा.ग.वि.अ. पं.स.** **गट विकास अधिकारी (ऊ.श्रे.) पं.स.**

जिल्हा परिषद नाशिक अंतर्गत जिल्हा सेवा वर्ग-३ व ४ मधील विविध पदांच्या नियुक्तीसाठी दि. ०१ जानेवारी, २०१९ रोजी पात्र असलेल्या ग्रामपंचायत कर्मचा-यांची सुधारित प्रारुप जेष्ठता सूचीवरील आक्षेप बाबतचे प्रपत्र.

| अ.क्र. | कर्मचा-याचे नांव | प्रारुप जेष्ठता सूचीवरील आक्षेप क्रमांक | आक्षेपाचे स्वरुप | आक्षेपास पुराव्याबाबत माहिती | खातेप्रमुख/ग.वि.अ. यांचे अभिप्राय | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |